ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

"अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २० | पुणें, बुधवार तारीख १ डिसेंबर, १९५४ | अंक ४३

## विविध माहिती

**कुटुंब-नियोजन परिषदेचें अधिवेशन**—कुटुंब-नियोजन परिषदेनें दुसरें अखिल भारतीय अधिवेशन लखनौ विद्यापीठांत ता. १ ते ४ जानेवारी, १९५५ पर्यंत भरविण्यांत येणार आहे. परिषदेंत लोकसंख्येवर मर्यादा घालणें, गर्भधारणेविरुद्ध योजावयाचीं साधनें, लैंगिक शिक्षण, विवाहाबद्दल मार्गदर्शन, इत्यादि संबंधित विषयांवर चर्चा होणार आहे.

**चहावरील निर्यात कर वाढणार**—चहाच्या निर्यातीवर दर १०० पौंडांमागें २ रुपये घेण्यांत येणारा कर ४ रुपये करण्याचा भारतीय सरकारचा विचार आहे, असें समजतें. त्यासाठीं जरूर असणारा कायदा पार्लमेंटच्या येत्या अधिवेशनांत मांडला जाण्याचें घाटत आहे. चहाला परदेशांतून येणारी वाढती मागणी लक्षांत घेऊन, कराचें उत्पन्न वाढवून, त्यांतून मळ्यांवरील मजुरांना अधिक सुखसोयी देण्याचा सरकारचा विचार आहे.

**निर्वासितांची पुनर्वसाहत**—पूर्व बंगालमधून आलेल्या सुमारें १,२५,००० निर्वासितांची त्रिपुरा राज्यांत पुनर्वसाहत करण्याची योजना भारतीय सरकारनें आंखली आहे. त्रिपुरा राज्यांत निर्वासितांसाठीं ४० वसाहती स्थापन करण्यांत येणार आहेत. सर्व वसाहतींसाठीं मिळून ३·५ कोटी रुपये कर्ज व मदत ह्यांच्या रूपानें खर्च करण्यांत येणार आहेत.

**तागाखालील जमिनींत वाढ**—१९५४-५५ सालांतील भारतामधील तागाच्या पिकाचा अंदाज ३१,५३,००० गांसड्या करण्यांत आला आहे. तागाच्या पिकाखालील एकूण जमीन सुमारें १२,७३,००० एकर असावी. गेल्या वर्षीपेक्षा २४,००० अधिक गांसड्या ताग होईल. तागाखालील जमीन ७७,००० एकरांनीं वाढली आहे, असें समजतें.

**संशोधनासाठीं शिष्यवृत्ति**—स्वीडनमधील एलिन वॅगनर फौंडेशन ह्या संस्थेनें प्राचीन काळांतील स्त्री-जीवनाविषयीं संशोधन करण्यासाठीं १०,००० स्वीडिश क्राऊन्सची शिष्यवृत्ति जाहीर केली आहे. त्यानंतरच्या काळांत स्त्रियांच्या सामाजिक स्थानांत जें परिवर्तन झालें, त्यासंबंधींहि संशोधन करावयाचें आहे.

**सहकारी संस्थांची नवी कामगिरी**—बेळगांव जिल्ह्यांतील सहकारी संस्थांनीं सेंट्रल कोऑपरेटिव्ह बँकेच्या नेतृत्वाखालीं एका नव्या समाज-विकास योजनेच्या कार्याला प्रारंभ केला आहे. ह्या कामासाठीं जरूर असलेली माहिती मिळविण्याचें कार्य पूर्ण झालें आहे. चिक्कोडी तालुक्यांतील ३८ खेडेगांवांची तपासणी करून ही माहिती जमविण्यांत आली आहे.

**जपान कमी कापड निर्गत करणार**—जपाननें आपली कापडाची निर्गत निम्म्यानें कमी केली आहे. त्यामुळें, परदेशांतील जपानी कापड ३०% महाग होईल.

**कामगारांसाठीं आरोग्य विमा योजना**—सौराष्ट्र सरकारनें राज्यांतील कामगारांच्या आरोग्याविषयीं एक विमा योजना तयार केली आहे. ज्या कामगारांचे आरोग्यविषयक विमे उतरविण्यांत येतील त्यांच्या कुटुंबियांनाहि वरील योजनेचा फायदा मिळणार आहे. सौराष्ट्रांतील सुमारें ५०,००० कामगार, योजनेच्या कक्षेंत येतील. त्यांतील बहुसंख्य कामगार कापड गिरण्यांतील आहेत.

**खाणींच्या व्यवस्थेसाठीं योजना**—खाणी व खनिजें ह्यांची व्यवस्था पहाण्यासाठीं बिहार सरकारनें एक योजना तयार केली आहे. ही योजना अंमलांत आणण्यासाठीं राज्य सरकारला दरवर्षी २॥ लाख रुपये खर्च येईल; त्याशिवाय प्राथमिक खर्चासाठीं म्हणून १२ लाख रुपये खर्च करावे लागतील ते वेगळेच.

**कृत्रिम पाऊस व्यावहारिक कोटींत नाहीं**—"मोठ्या प्रमाणावर कृत्रिम रीतीनें पाऊस पाडतां येणें शक्य नाहीं. एकाद्या ठराविक ठिकाणीं ढग थांबवून, त्यांना पाऊस पाडावयास लावणें शक्य झालें तरी मोठ्या भूपृष्ठावर पाऊस पाडतां येणार नाहीं. ग्रेटब्रिटन, अमेरिका, पूर्व आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, इत्यादि ठिकाणचे प्रयोग हेच सांगतात":—डायरेक्टर जनरल ऑफ मीटिऑरॉलजी.

**तेवीस नव्या साखर कारखान्यांना लायसेन्स**—सध्यां भारतांत १५९ साखर कारखाने असून त्यांत दररोज १·३७ लक्ष टन ऊंस गाळतां येतो. बहुसंख्य कारखाने संयुक्त प्रांत व बिहार येथें आहेत. मध्यवर्ती सरकारनें चालू वर्षी २३ नवे साखर कारखाने उभारण्यासाठीं परवानगी दिली. ते सर्व सुरू झाल्यावर वार्षिक उत्पादन ३ लक्ष टनांनीं वाढेल. एक कारखाना १९५४-५५ मध्यें, तीन १९५५-५६ मध्यें व बाकीचे १९५६-५७ मध्यें सुरू होतील.

**रेयॉनचा ६ कोटी रुपयांचा कारखाना**—इटालिअन इंजिनिअर्सच्या मदतीनें रेयॉन सिल्क तयार करणारा भारतांतील सर्वांत मोठा कारखाना कल्याण किंवा पनवेल येथें उभारण्यांत येणार आहे. त्याला ६ कोटी रुपयांचें भांडवल लागेल.

**स्विस वनस्पतिशास्त्रज्ञांनीं जमवलेली 'संपत्ति'**—गौरीशंकर शिखर काबीज करण्यासाठीं आलेल्या स्विस टोळीच्या दोघा गिर्यारोहक वनस्पति शास्त्रज्ञांनीं परत जातांना बरोबर हिमालयांत वाढणाऱ्या १,२०० वनस्पती घेतल्या आहेत. त्यांतील कांहीं १९,००० फूट उंचीवर जाऊन गोळा करण्यांत आलेल्या आहेत. वाळविलेल्या वनस्पतींची चार बोजकीं, बियांचे दोन पेटारे, जिवंत ऑर्किडची एक टोपली, इत्यादि त्यांचे सामानांत आहेत.

## ब्रिटिश बँकरचा सल्ला

ब्रिटनमधील सुप्रसिद्ध बँकर सर केनेथ मिलिंग ह्यांचें मुंबईला रोटरी क्लबातर्फे व्याख्यान झालें. व्याख्यानाचा विषय 'आग्नेय आशिया आणि अतिपूर्वेकडील व्यापारी संबंध' असा होता. आग्नेय आशिया आणि अतिपूर्व ह्या भागाचा दौरा करून ते परत आले होते. ह्या भागांतील सध्याच्या परिस्थितीची त्यांनीं आपल्या व्याख्यानांत चांगली कल्पना करून दिली. सर केनेथ आपल्या भाषणांत म्हणाले कीं, कम्युनिझमला सर्वांत मोठा अडथळा कोणता असेल तर तो समृद्धीचा आहे. व्यापार व उद्योगधंदे ह्यांची वाढ करून समृद्धि उत्पन्न करतां येईल. व्यापार व उद्योगधंद्याच्या आंतरराष्ट्रीय वाढीला बँकांचा उपयोग यंत्रांत घालावयाच्या वंगणाप्रमाणें होत असतो. भारतामधील धंदेवाल्यांनीं व उद्योगपतींनीं आंतरराष्ट्रीय व्यापार वाढवून व औद्योगिक विकास साधून समृद्धि उत्पन्न करावी. जपानमधील परिस्थितीसंबंधीं बोलतांना त्यांनीं अशी माहिती दिली कीं, जपान सध्या आर्थिक दृष्टया फार मोठ्या संकटांत सांपडलेला आहे. जपानची सध्याची लोकसंख्या ८·५ कोटी आहे आणि ती दरवर्षी १० लाखांनीं वाढत आहे. जपानची परिस्थिती ब्रिटनप्रमाणेंच आहे. ब्रिटनला ज्या प्रमाणें इतर राष्ट्रांशीं व्यापार केल्याखेरीज जगता येणेंच शक्य नाहीं, त्याचप्रमाणें जपानलाहि इतर राष्ट्रांशीं व्यापार करणें अपरिहार्य आहे. भारताच्या पंचवार्षिक कार्यक्रमाचाहि त्यांनीं आपल्या भाषणांत उल्लेख केला. भारतीय जीवनाला आधुनिक तऱ्हेचें वळण लावण्याचा मोठा व जोराचा प्रयत्न ह्या कार्यक्रमांच्या रूपानें करण्यांत येत आहे, असें मत त्यांनीं व्यक्त केलें. जपानच्या आर्थिक परिस्थितीविषयीं त्यांनीं व्यक्त केलेले विचार आजवर अनेकांनीं बोलून दाखविलेले आहेत. पण ब्रिटन व्यापार-उद्योगाबाबत जितकें स्वतंत्र आहे तितकें जपान नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेणें जरूर आहे.

---

## भारतामधील पोलादाचे नवे कारखाने

भारतांत पोलादाचे दोन नवे कारखाने काढण्याच्या वाटाघाटी सध्यां चालू आहेत. त्यापैकीं एक कारखाना रशिअन तंत्रज्ञांच्या साहाय्यानें काढण्यांत येणार आहे. भारतीय सरकारचे प्रतिनिधी आणि रशिअन सरकारतर्फे धाडण्यांत आलेले तज्ज्ञ ह्यांच्यांत हल्लीं वाटाघाटी चालू आहेत. रशिअन तंत्रज्ञांच्या साहाय्यानें काढण्यात येणाऱ्या कारखान्याची वार्षिक उत्पादनक्षमता ५ लाख टन पोलादाची ठेवण्यांत येणार होती, अशी वार्ता होती. परंतु आतां ही उत्पादनक्षमता वाढवून १० लाख टनांपर्यंत ठेवण्यांत येणार असल्याचें समजतें. कारखान्याला लागणारी यंत्रसामुग्री रशिआच पुरविणार असल्याचें पूर्वी प्रसिद्ध झालें आहे. ह्या कारखान्याच्या उभारणीच्या अटी अद्याप जाहीर झालेल्या नाहींत. ह्याच वेळीं बिर्ला बदर्स ह्यांनीं कांहीं ब्रिटिश कारखानदारांशीं पोलादाचा कारखाना काढण्याबाबत वाटाघाटी चालू केल्या आहेत. ब्रिटिश कारखानदारांनीं कारखान्याची यंत्रसामुग्री पुरविण्याचें कबूल केलें असून तिची किंमत ५ ते ७ वर्षांत फेडावयाची आहे, असें समजतें. ब्रिटिश कारखानदारांनीं आपल्या भांडवलाबाबत भारतीय सरकारकडे हमीची मागणी केली आहे अशीहि वार्ता आहे. त्याशिवाय कारखान्याची जागा तयार करणें, यंत्रसामुग्रीची प्रत्यक्ष उभारणी करणें, कारखान्याची वसाहत वसविणें व इतर अनुषंगिक कामें करणें, ह्यांचाहि सर्व भारतीय सरकारनेंच करावा अशी त्यांची मागणी आहे. पं. नेहरू ह्यांनीं अलीकडे केलेल्या भाषणांतून उत्पादनाच्या साधनांच्या सामाजिक मालकीवर अधिक भर दिलेला आढळून येतो. त्यामुळें परदेशी कारखानदारांची मनःस्थिति किंचित् गोंधळल्यासारखी झालेली दिसते. परदेशीय भांडवलदारांनीं भारतांत भांडवल गुंतवितांना सावधगिरी बाळगण्याचें धोरण स्वीकारलेलें दिसतें.


राष्ट्राच्या प्रगतीबरोबरच स्वतःचा अभ्युदय करा.

दशवार्षिक नॅशनल प्लॅन सर्टिफिकेटस् खरेदी करा.

A. C. 623.


## अभ्रकाच्या निर्यातींत घट

भारतामधून निर्यात होणाऱ्या खनिजांत अभ्रक हें एक महत्त्वाचें खनिज आहे. अभ्रकाच्या निर्यातीमुळें भारताला दरवर्षी १० कोटी रुपयांची परदेशीय हुंडणावळ प्राप्त होते. तथापि गेल्या कांहीं वर्षांत अभ्रकाची निर्यात घटत चालली आहे. बिहार सेंट्रल लेबर ॲडव्हायजरी बोर्डाचे सदस्य, श्री. भट्टाचार्य ह्यांनीं ह्या परिस्थितीकडे लक्ष वेधणारें पत्रक प्रसिद्ध केलें आहे. श्री. भट्टाचार्य आपल्या पत्रकांत म्हणतात कीं, अभ्रकाची निर्यात तर घटलीच आहे पण त्याच्या किंमतीहि उतरल्या आहेत. १९५१–५२ सालीं भारतानें ४,०८,००० हंड्रेडवेट अभ्रक निर्यात केलें. त्याची किंमत सुमारें १३·२१ कोटी रुपये आली. पण आतां निर्यात २,५०,००० हंड्रेडवेटपर्यंत घसरली असून त्याची किंमत अवघी ७·९५ कोटी रुपये आली. ह्या परिस्थितीची कारणें नमूद करतांना त्यांनीं पुढीलप्रमाणें माहिती दिली आहे. अमेरिकेकडून अभ्रकाला असणारी मागणी कमी झाली आहे. कारण, इतर कांहीं देशांकडून अमेरिकेला अभ्रक मिळूं लागलें आहे. त्याचबरोबर अभ्रकाच्या ऐवजीं त्याच प्रकारचे दुसरें कृत्रिम पदार्थ वापरण्यांत येऊं लागले आहेत. भारत मधील खाणींचें उत्पादनहि कमी झालें आहे. शिवाय, अभ्रक विकणारे चढाओढ करूं लागले आहेत. अमेरिका हें भारतीय अभ्रकाचें मुख्य गिऱ्हाईक होतें. पण अलीकडे ब्राझिल आणि मादागास्कर ह्या देशांकडून अमेरिका अभ्रक खरेदी करूं लागली आहे. १९५१ सालीं अमेरिकेनें भारताकडून १,६५,००० हंड्रेडवेट अभ्रक आयात केलें. आतां हा आकडा ७२,००० हंड्रेडवेटपर्यंत खालीं आला आहे. मागणी नसल्यामुळें बिहारमधील अभ्रकाच्या खाणींचें उत्पादन ४० टक्क्यांनीं घटलें आहे. अभ्रकाच्या खाणींची पुनर्घटना करून ह्या धंद्याला इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनकडून मदत देणें जरूरीचें झालें आहे.

---

**भारतामधील फळबाग**—भारतांत सुमारें ३२ लाख एकर जमिनींत फळझाडांची लागवड करण्यांत येते असा अंदाज करण्यांत आला आहे. सर्वांत अधिक म्हणजे २२ लाख एकर जमिनींत आंब्यांची लागवड करण्यांत येते. त्याच्या खालोखाल केळ्यांची लागवड करण्यांत येते. केळ्यांची लागवड सुमारें ३,००,००० एकर जमिनींत करण्यात येते.

# अर्थ

बुधवार, ता. १ डिसेंबर, १९५४





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मोठ्या कारखान्यांतील लबाड्यांचे प्रकार

कारखानदारींतील लबाड्या करणारे लोक आणि कारखान्याची संस्था ह्यांचे हितसंबंध सारखेच नसतात. स्वतःचा पैसा कोणीच चोरीत नाहीं, हें उघडच आहे. कारखान्यांतील पगारदार नोकरांची संख्या वाढत आहे व पगारापलीकडे त्यांना कारखान्याबद्दल आपुलकी वाटत नाहीं; अशा लोकांत लबाडीची प्रवृत्ति वाढत आहे. प्रत्यक्ष नोटा लांबविण्याची गोष्ट सोडली, तर बहुतेक लबाड्यांत खरेपणा थोडासाच सोडून प्रत्येक वेळीं काम भागविलें जातें, असें आढळून येईल.

प्रत्येक मोठ्या कारखान्यांत मालाची खरेदी करण्याचें काम कांहीं थोड्या लोकांच्या हातीं केंद्रित असतें. किंमती व दर्जा हें ठरवून ऑर्डर कोणाला द्यावयाची हें त्यांच्यावर सोंपविलेलें असतें. बाजारांतील चालू भावापेक्षा जास्त दर लावण्यास सांगून, किंवा एकाच व्यापाऱ्याला प्रत्येक ऑर्डर देऊन पैसा खातां येतो. कमींत कमी दराचें टेंडर भरणाराला ऑर्डर देण्याच्या पद्धतींतहि पैसा खाण्यास वाव असतोच. परचेसिंग अधिकारी इतरांचीं टेंडरें आपल्या पित्त्या व्यापाऱ्याला दाखवून त्याचेकडून त्यांच्यापेक्षा जरा कमी दराचीं टेंडरें भरून घेऊं शकतो. एकाच टेंडरामधील शेकडों बाबींपैकी प्रत्येक बाबींतच ३ ते ४% कमी दरानें माल देऊं करणारा एकच व्यापारी निघाला, तर बिंग बाहेर पडतें. कांहीं थोड्या बाबींत ३ ते ४% जास्त दर टेंडरमध्यें टाकला तर बिंग पचून जातें. कांहीं ठराविक निवडक व्यापाऱ्यांकडून कोटेशन्स मागविण्याची पद्धत कांहीं ठिकाणीं अमलांत आहे. परचेसिंग ऑफिसर सर्वच व्यापाऱ्यांना बाजारभावापेक्षा जास्त दरानें कोटेशन देण्यास सांगतो व त्यांपैकी कोणाला ऑर्डर मिळावी, हें व्यापाऱ्यांनीं एकमेकांच्या अनुमतीनें ठरवावयाचें असतें. प्रत्येक वेळीं एकानें, अनुक्रमशः, इतरांच्यापेक्षा कमी पण बाजारभावापेक्षा जास्त किंमतीचें कोटेशन द्यावें, अशीहि पद्धत नंतर अंमलांत येते. अशा रीतीनें 'सहकार्य' न करणाऱ्या व्यापाऱ्यांना 'निवडक' यादींत येऊंच न देणें आणि कोटेशनमधील किंमती ह्या नेहेमींच बाजारभावापेक्षा जास्त असतात हें वरिष्ठ अधिकाऱ्यांना कळूं न देणें, हें परचेसिंग अधिकाऱ्याचें धोरण असतें.

स्टोअरमधून प्रत्यक्ष माल चोरीस जाणें कठीण असतें, पण कितीहि बंदोबस्त केला तरी गळती चालूच राहते! कोळसा किंवा तेल ह्यासारख्या मालाचे बाबतींत जरा कनिष्ठ दर्जाचा माल स्वीकारला, कीं परचेसिंग अधिकाऱ्याला कूस राहूं शकते. बिलांत नमूद केलेल्या मालापेक्षा प्रत्यक्ष माल कमी आणणें, हा पैसे खाण्याचा अधिक रूढ प्रकार आहे. प्रत्येक खात्याकडे मागणीप्रमाणें माल देतांना थोडाथोडा कमी देऊन तूट भरून काढतां येते. एका मॅनेजरला शंका येऊन त्यानें गोडाऊन तपासून पाहिलें, तेव्हां त्याला डबे हिशेबांतील पुस्तकापेक्षा जास्त आढळले! प्रारंभींच्या स्टॉकमध्यें हे जादा डबे दाखविले नव्हते; जादा डब्यांची संख्या ५% होती; रिकामे डबे जेवढे असावयास पाहिजेत त्यापेक्षा ५% कमी होते. मॅनेजरला शंका येऊन त्यानें दुसऱ्या दिवशीं आलेला माल स्वतः तपासला, तेव्हां त्यांत ऑर्डरीपेक्षा ५% डबे कमी होते. बाहेरून आणतांनाच कांहीं रिकामे डबे आणण्याचें स्टोअर-कीपरला जमलें नव्हतें, म्हणून ही लबाडी उघडकीस आली.

हिशेबांत जास्त आंकडा मांडून कमी माल खात्यांना द्यावयाचा; अशा रीतीनें जादा स्टॉक निर्माण करावयाचा; पुढील ऑर्डरच्या वेळीं बिलापेक्षा कमी माल प्रत्यक्ष आणून हिशेब बरोबर करावयाचे आणि माल पुरविणारा व स्वतः ह्यांत फायदा वाटून घ्यावयाचा, अशीहि एक पद्धत आहे.

एका खात्याचा टाइमकीपर कामगारांच्या यादींत २० खोटीं नांवें (एकूण खऱ्या कामगारांच्या सुमारें ५%) घालीत असे. पगार देण्याचे वेळीं सर्व कामगारांचा फोटो काढून त्यांचीं नांवें माहीत करून घेण्याची कांहीं ठिकाणची पद्धत अशा लबाडीस आळा घालूं शकते. पगाराचे वेळीं, खोटीं नांवें धारण करणारे लोक वरचेवर हजर करणें टाइमकीपरला अशक्य होतें व लबाडी उघडकीस येऊं शकते. विशिष्ट कामासाठीं नेमक्या किती कामगारांची आवश्यकता आहे, हें वरिष्ठ अधिकाऱ्याला नीट माहीत नसलें, म्हणजे खोट्या नांवावर पगार मांडणें साधतें.

कारखान्याच्या उत्पादन-खात्यांत लबाडीला वाव सर्वांत कमी असतो. तेथील नोकरांचा बाहेरच्या लोकांपर्यंत संबंध क्वचितच पोंचूं शकतो; त्यांच्या कामाचें मोजमाप बिनचूक करतां येतें व त्यांनीं लबाडी करावयाची म्हटलें तर त्यासाठीं फार लोकांचें सहकार्य आवश्यक असतें. कंपनीच्या मोटारींचा व ट्रक्सचा खाजगी कामासाठीं वापर, ही बाब बऱ्याच ठिकाणीं आढळते. जरूरीपेक्षा वहातुकीच्या मोटारी जास्त असल्या, म्हणजे लबाडीस वाव अधिक मिळतो.

विक्री खात्याच्या लोकांचा, तयार मालाची किंमत ठरविण्याशीं संबंध येतो. पडलेल्या किंमतीवर ठराविक नफ्याचें प्रमाण ठेवून माल विकण्याचें ठरविलें, तर लबाडीस वाव उरत नाहीं. पण, बाजारांत त्या मालास अधिक किंमत येत असेल तर सेल्स मॅनेजर नेहमींच्या व्यापाऱ्यांच्या ऑर्डरी तुंबून ठेवून परस्पर जास्त दरानें विक्री करतो आणि कंपनीला मात्र जादा किंमतीचा फायदा मिळत नाहीं. स्पर्धा करणारे इतर कारखानदार स्वस्त किंमतींनें माल विकतात, अशी सेल्समन्सची नेहमीं तक्रार असते. बाजारांत तेजी असो वा मंदी असो, विक्रीखात्यांतील लोकांना लबाडीस नेहमींच वाव राहतो.

कॅशियर लोक प्रत्यक्ष पैसा हाताळत असले, तरी त्यांना कारखान्याच्या कारभाराच्या यंत्रणेंत उघडकीस न येण्याजोगी लबाडी करण्यास सर्वांत कमी वाव असतो! पैशाचा प्रत्यक्ष अपहार उघडकीस आल्याविना राहत नाहीं. इतर खात्यांतील लबाड्या, लबाडांच्या दृष्टीनें कमी धोकेदायक असतात!

### इंडियन बँक्स असोसिएशनची

## बँक नोकरांना आग्रहाची विज्ञापना

( बँक कामगारांनीं १० डिसेंबर रोजीं संप करण्याचें योजिलें आहे. त्यास अनुलक्षून इंडियन बँक्स असोसिएशननें काढलेलें पत्रक )

राजाध्यक्ष कमिटीशीं बँक कामगारांनीं सहकार्य केल्यानें त्यांचें कांहींहि नुकसान होणार नाहीं; उलट त्यामुळें आणि जरूर ती माहिती राजाध्यक्ष कमिटीला मिळण्यास मदत करून तिला सरकारला शिफारसी करण्यास साहाय्य केल्यानें कामगारांचा फायदाच होण्याचा संभव आहे, अशा अर्थाचें एक पत्रक इंडियन बँक्स असोसिएशननें वृत्तपत्रांकडे ५ नोव्हेंबर, १९५४ रोजीं पाठविलें होतें. बँका राजाध्यक्ष कमिटीशीं ज्याप्रमाणें सहकार्य करीत आहेत, त्याप्रमाणें सर्व कामगारहि सहकार्य करतील अशी उत्कट आशा त्यांत व्यक्त केली होती. १९ नोव्हेंबर, १९५४ रोजीं भारत सरकारचे मजुरमंत्रि, श्री. खंडुभाई देसाई, ह्यांनीं लोकसभेंत निवेदन करून बँक कामगारांना आश्वासन दिलें कीं, श्री. राजाध्यक्ष ह्यांच्या शिफारसींवर सरकार जो निर्णय घेईल, तो आधीपासूनच अंमलांत आला असें मानलें जाईल व ज्या कामगारांचें प्रॉव्हिडंट फंड, ग्रॅच्युइटी आणि बोनस ह्याबाबत मधल्या काळांत जें नुकसान होईल तें भरून दिलें जाईल.

राजाध्यक्ष कमिटीशीं कांहीं बँक कामगार सहकार्य करीत आहेत, ही समाधानाची गोष्ट असली, तरी असोसिएशननें अशा सहकार्याची केलेली विनंती आणि मजूर मंत्र्यांचें आश्वासन ह्यांस न मानता कांहीं बँक कामगार १० डिसेंबर, १९५४ पासून संपावर जाण्याचा विचार करीत आहेत, हें पाहून असोसिएशनच्या सभासद-बँकांना अत्यंत खेद होत आहे. सरकारी ऑर्डरीनें दुरुस्त केलेला लेबर अपेलेट ट्रायब्यूनलचा निवाडा अंमलांत असतांना नियोजित संप बेकायदा होईल आणि तो बँकांनाच नव्हे तर जनतेला आणि प्रत्यक्ष कामगारांनाहि हानिकारक होईल, हें कामगारांच्या व जनतेच्या निदर्शनास आणणें असोसिएशनला नाइलाजाचें झालें आहे. २३ सप्टेंबर, १९५४ रोजीं कांहीं बँक कामगारांनीं काम बंद ठेवलें, तेव्हां असोसिएशनच्या सल्ल्यावरून बँकांनीं कामगारांचा त्या दिवसाचा पगार कापला नाहीं व त्यांच्यावर शिस्तयोजनाहि केली नाहीं. कामगार पुनः १० डिसेंबर, १९५४ पासून बेमुदत संपावर गेले, तर संपामुळें जनता, व्यापार, उद्योग, ह्यांची होणारी भयंकर गैरसोय विशेषें-करून लक्षांत घेऊन, बँकांना पूर्वीच्या संपाच्या वेळेचे सलोख्याचें धोरण कायम ठेवतां येणार नाहीं, असें असोसिएशनला वाटतें.

दुःखदायक परिणाम घडवून आणणाऱ्या बेकायदा संपाचा अवलंब करण्याचा विचार बँक कामगारांनीं सोडून द्यावा आणि राजाध्यक्ष कमिटीला संपूर्ण सहकार्य करावें. अशा सहकार्यामुळें दीर्घकाळ चाललेला हा तंटा मिटण्यास मदत होईल व बँका आणि त्यांचे कामगार ह्यांचेमधील सलोखा पूर्ववत नांदूं लागेल, अशी इंडियन बँक्स असोसिएशन बँक कामगारांना पुनः विज्ञापना करीत आहे.

---

### सुएझ कालवा रुंद करणार

सुएझच्या कालव्यांतील वहातुकीस सोईचें जावें म्हणून तो कालवा कांहीं ठिकाणीं अधिक रुंद व कांहीं ठिकाणीं जास्त खोल करण्याचें सुएझ कॅनॉल कंपनीनें ठरविलें आहे. हें काम पुरें होण्यास ५–६ वर्षें लागतील.

### चीनची आर्थिक प्रगति

भारतीय लोकसभेचे सदस्य, डॉ. साहेब सिंग सोखी हे नुकतेच चीनचा दौरा करून परत आले. भारतामधून अधिकाधिक प्रतिनिधि मंडळें चीनला गेलीं तर चीनमधील आर्थिक प्रगतीची माहिती मिळणें सुलभ होईल असें मत त्यांनीं पत्रकारांशीं बोलतांना व्यक्त केलें. भारतामधून चीनला गेलेल्या प्रतिनिधि मंडळांना जें जें पहावेसें वाटतें तें पाहून देण्यांत येतें, अशीहि माहिती त्यांनीं सांगितली. चीनमधील औद्योगीकरणाविषयीं बोलतांना ते म्हणाले कीं, चीनचें औद्योगीकरण पंचवार्षिक योजनांनीं चालू आहे. सध्यां अंमलांत येत असलेल्या पंचवार्षिक योजनेंत ६०० नवे कारखाने उभारण्याचा संकल्प समाविष्ट करण्यांत आलेला आहे. ह्या कारखान्यांपैकीं सुमारें १५० कारखान्यांना रशिआ यंत्रसामुग्री आणि तज्ज्ञ दोन्हींहि पुरविणार आहे. डॉ. सोखी ह्यांनीं चीनमधील बऱ्याच नव्या कारखान्यांना भेटी दिल्या. त्यापैकीं उत्तर चीनमध्यें उघडण्यांत आलेल्या मोटारींच्या कारखान्यासंबंधीं बोलतांना ते म्हणाले, कीं हा कारखाना उभा करण्यास दोन वर्षें लागलीं आणि त्याच्या उभारणीसाठीं रशिआनें मदत केलेली होती. कारखान्यांत आतां सर्व प्रकारच्या मोटारी होऊं लागल्या आहेत. कारखान्याचें वार्षिक उत्पादन सुमारें ३०,००० मोटारींचें आहे. भारी वजनाच्या ट्रक्सहि आतां ह्या कारखान्यांत तयार होऊं लागल्या आहेत. शेतीच्या बाबतींतहि चीननें प्रगति केलेली दिसून येते. जमीनदारीचा शेवट करण्यांत आला असून जमीनधारणेसंबंधींचे जुने सरंजामदारी कायदे रद्द करण्यांत आले आहेत. ह्या सर्व सुधारणांचा परिणाम आतां दिसून येऊं लागला आहे. चीनमधील शेतीचें उत्पन्न १७ टक्क्यांनीं वाढल्याचें दिसून आलें आहे.

---

### भारतामधील क्षयरोगाविरुद्ध मोहीम

कोइमतूर येथें ऑल इंडिया बी. सी. जी. वर्कर्स ह्या संघटनेची परिषद् भरविण्यांत आली होती. क्षयरोगाविरुद्ध उपयुक्त ठरणारी लस टोचण्याची मोहीम भारतांत जोरानें चालू आहे. ह्या मोहिमेंत येणाऱ्या अनुभवांची आणि कार्यक्रमाची रूपरेषा आखण्यासाठीं परिषद् भरविण्यांत आली होती. भारतीय सरकारचे क्षयरोगाबद्दलचे सल्लागार डॉ. पी. व्ही. बेंजामिन हे अध्यक्षस्थानीं होते. ते आपल्या भाषणांत म्हणाले, कीं सध्यां सर्व देशभर क्षयरोगाविरुद्ध जोरानें उपाययोजना करण्यांत येत आहे. निरनिराळीं राज्य-सरकारें मिळून दरवर्षीं सुमारें ३५ ते ४० लाख रुपये ह्या कार्यावर खर्च करीत आहेत. येत्या चार-पांच वर्षांत ह्या कामासाठीं ४०० लक्ष रुपये खर्च करण्यांत येणार आहेत. भारताच्या एकूण लोकसंख्येपैकीं १५ कोटी लोक ह्या कालावधींत क्षयरोगाविरुद्ध चालू असलेल्या मोहिमेच्या कक्षेत येतील असा अंदाज आहे. सर्वच राज्यांत ही मोहीम चालू असली तरी कांहीं राज्यांत तिनें विशेष आघाडी मारली आहे. बिहार, उत्तर-प्रदेश, हैदराबाद, म्हैसूर आणि त्रावणकोर-कोचीन ह्या राज्यांत क्षयरोगाची लस टोचण्याच्या बाबतींत चांगलें कार्य करण्यांत आलेलें आहे व येत आहे, अशी माहिती त्यांनीं सांगितली. क्षयरोग हा मुख्यतः निकस अन्न आणि आरोग्याला हानिकारक अशा रहात्या जागा ह्यांच्यामुळें उद्भवतो असा अनुभव आहे. तेव्हां चांगलीं घरें आणि सकस अन्न ह्यांची सोय प्रथम व्हावयास पाहिजे. तथापि, हा प्रश्न आर्थिक असल्यामुळें दरम्यानच्या काळांत क्षयरोगाविरुद्ध चालविलेली मोहीमहि उपयुक्तच ठरणार आहे.

# संयुक्त महाराष्ट्रांतील "वनस्पति" व्यवसाय

लेखक :
श्री. शां. म. डहाणूकर, बी. ई., एस. एम. (यू. एस. ए.), एम. एल. सी.

सबंध देशांतील "वनस्पति" व्यवसायाचें ठोकळ चित्र गेल्या २४ नोव्हेंबरच्या अंकांतील लेखांत पाहिल्यानंतर आतां मुंबईसह मराठी भाषिक विभागांतील या धंद्याकडे वळूं. संयुक्त महाराष्ट्रांत हल्लीं एकूण बारा कारखाने अस्तित्वांत आहेत. यांतील सहा कारखाने शहरांत आहेत. या बारा कारखान्यांची उत्पादनक्षमता १,३४,००० टन असून ही देशाच्या एकूण उत्पादनक्षमतेच्या सुमारे ३८ टक्के आहे. मात्र गेल्या सालचें प्रत्यक्ष उत्पादन अवघें ७६,००० टन झालें. म्हणजे, जवळजवळ ४५ टक्के उत्पादनशक्ति उपयोगांत आणली गेली नाहीं.

### उत्पादनास आवश्यक कच्चा माल

हा धंदा चालविण्यासाठी मुख्यतः भुईमुगाचें तेल व तिळाचें तेल लागतें. याशिवाय लागणारीं रसायनें आणि डब्यांस लागणारी पत्रा या प्रमुख गोष्टी होत. सुदैवानें महाराष्ट्रांत तीळ व भुईमुगाचें पीक जवळ जवळ ४॥–५ लाख टनांचें असून या धंद्यास लागणारा कच्चा माल येथेंच मिळूं शकेल. 'वनस्पती' बनविण्यास लागणारीं रसायनें हीं आजच्या प्रमाणेंच पुढेंहि बाहेरून आणावीं लागतील. पण यांतहि लागणाऱ्या दोन मुख्य रसायनांचें उत्पादन महाराष्ट्रांत करणें शक्य आहे; व तें कदाचित् पुढें होईलहि. हीं दोन रसायनें म्हणजे कॉस्टिक सोडा व ब्लीचिंग अर्थ ही होत. महाराष्ट्रांत डबे बनविण्याचे कारखाने भरपूर आहेत. तरीसुद्धां डबे बनविण्यास लागणारा पत्रा (Tin plate) हा आजच्याप्रमाणेंच पुढेंहि बाहेरून आणावा लागेल.

### भांडवल व लोकांना कामधंदा

या एकूण बारा कारखान्यांमध्यें जवळजवळ ८–८॥ कोटी रु. एकूण भांडवल गुंतलेलें आहे. तसेंच या कारखान्यांतून प्रत्यक्ष कामास असणाऱ्या कामगारांची संख्या सुमारें ४,००० असून अप्रत्यक्ष रीत्या आणखी १४–१५ हजार लोकांस काम मिळतें. तसेंच 'वनस्पती'ची विक्री करण्याच्या कामांत महाराष्ट्रांत अंदाजें ७–८ हजार दुकानदारांस वा व्यापारांस काम मिळतें.

### उत्पादन व उत्पन्नाचें साधन

हल्लीं ज्या प्रमाणांत 'वनस्पती' वापरांत आहे त्यावरून अंदाज केला, तर महाराष्ट्रांतील एकूण तीन कोटी लोकांत १७,००० ते १८००० टन 'वनस्पती'चा वार्षिक खप आहे. 'वनस्पतीं'च्या वाढत्या व्यापामध्यें हा खप वाढवून ३०,००० टनांपर्यंत नेणें शक्य आहे. असें जरी असलें तरी महाराष्ट्रांतील 'वनस्पती' कारखान्यांची उत्पादनक्षमता सुमारें १,३०,००० टन असल्यामुळें प्रतिवर्षी महाराष्ट्रांतून सुमारें ७५ हजार टन ते १ लाख टन इतकी 'वनस्पती' भारतांतील इतर राज्यांत व कांहीं प्रमाणांत परदेशींहि पाठवितां येईल. अशा तऱ्हेनें महाराष्ट्रास या धंद्यामुळें मोठें उत्पन्न मिळूं शकेल.

साखरेच्या धंद्यांतील उत्पादन महाराष्ट्राच्या गरजेपेक्षा कमी असल्यामुळें त्या धंद्यापासून अशा तऱ्हेनें बाहेरचें उत्पन्न मिळत नाहीं. 'वनस्पती' धंद्याचें मात्र हें असें वैशिष्ट्य आहे व या दृष्टीनें पाहिलें तर हा महाराष्ट्रांतील सर्वांत महत्त्वाचा खाद्यपदार्थाचा धंदा आहे असेंच म्हटलें पाहिजे.

'वनस्पती'चें वार्षिक एक लाख टन इतकें जर प्रत्यक्ष उत्पादन झालें (व हें सहज शक्य आहे) तर त्यापासून मध्यवर्ती सरकारला सुमारें १॥ कोटी रुपये एक्साइज कराच्या रूपानें व सुमारें ३० ते ४० लाख प्राप्तीवरील कराच्या रूपानें उत्पन्न मिळेल. इतकें उत्पादन करावयाचें झालें तर त्यासाठी सुमारें १,०५,००० टन तेल किंवा २॥ ते २॥। लक्ष टन शेंगदाणा कच्चा माल म्हणून लागेल. या कच्च्या मालाची खरेदी व 'वनस्पती'ची विक्री या उलाढालींवर विक्रीकराचे रूपानें मराठी भाषिक राज्य सरकारला अंदाजें दीड कोटी रु. उत्पन्न मिळेल. अशा तऱ्हेनें मध्यवर्ति व राज्य सरकारांना या धंद्यापासून बरेंच मोठें उत्पन्न मिळेल.

### वाया जाणाऱ्या तेलाची बचत

'वनस्पती' चा धंदा हा अशा तऱ्हेनें महाराष्ट्रास भूषणभूत असा धंदा आहे. तेलापासून 'वनस्पती' बनवितांना तेंच तेल शुद्ध केल्यामुळें त्याला टिकाऊपणा व रुचकरपणा कसा येतो, हें वर सांगितलेंच आहे. ह्याशिवाय 'वनस्पती'स स्निग्धरूप दिल्यामुळें वाहतुकींत जसें तेल गळून जाऊन नुकसान होण्याचा संभव असतो तसा 'वनस्पती' मध्यें असत नाहीं. तेलाच्या वाहतुकीमध्यें अंदाजें २ ते ३ टक्के तेल गळून गेल्यामुळें कमी होतें. देशांतील एकंदर शेंगदाण्याच्या तेलाची पैदास सुमारें ७ ते ८ लाख टन आहे. यापैकी २० ते २५ हजार टन तेल अशा तऱ्हेनें वायां जातें. 'वनस्पतीं'त रूपांतर केल्यामुळें ह्या वायां जाणाऱ्या तेलांत थोडी जरी बचत झाली, तरी हाहि देशाच्या दृष्टीनें फायदाच होय.

### मुंबईसह संयुक्त महाराष्ट्रांतील 'वनस्पती' चे कारखाने व त्यांचें उत्पादन

| क्रमांक | कारखान्याचें नांव | ठिकाण | वार्षिक उत्पादनक्षमता (टन) | १९५४ मधील प्रत्यक्ष उत्पादन (टन) |
|---|---|---|---|---|
| १. | अहमद उमरभाई | मुंबई | ३,००० | ८०५ |
| २. | अमृत ऑईल मिल्स लि. | शिवडी, मुंबई | ५,००० | ४,७७६ |
| ३. | बेरार ऑइल इंडस्ट्रीज | अकोला | १२,००० | १३,१२७ |
| ४. | बेरार स्वदेशी वनस्पती | शेगांव | ७,५०० | ४२९ |
| ५. | भारत वनस्पती प्रॉडक्ट्स् लि. | पाचोरें | ९,००० | १,८६७ |
| ६. | हिंदुस्तान वनस्पती मॅ. कं. लि. | शिवडी, मुंबई | ५५,००० | ३८,७७८ |
| ७. | इंडियन व्हेजिटेबल प्रॉ. लि. | माझगांव, मुंबई | १७,१०० | ९,१२८ |
| ८. | स्वस्तिक ऑईल मिल्स लि. | वडाळा, मुंबई | ९,००० | ४,०४७ |
| ९. | टाटा ऑइल मिल्स कं. लि. | शिवडी, मुंबई | १,२०० | १४ |
| १०. | व्हेजिटेबल व्हिटॅमिन फुड्स् कं. लि. | शीव, मुंबई | ७,८०० | ४८८ |
| ११. | वेस्टर्न इंडिया व्हेजिटेबल प्रॉ. लि. | अमळनेर | ३,००० | २,९४१ |
| १२. | वालचंदनगर इंडस्ट्रीज् लि. | वालचंदनगर | ४,५०० | ...... |
| | | एकूण... | १,३४,००० | ७६,४०० |

'वनस्पती' च्या कारखान्यांमुळें देशांतील तेल गाळण्याच्या धंद्यास प्रोत्साहन मिळालें आहे. 'वनस्पति' च्या धंद्याची वाढ होण्यापूर्वी हिंदुस्थानातील शेंगदाण्याची निर्यात मोठ्या प्रमाणावर होत असे. देशांतील तेलाच्या वाढत्या गरजेमुळें आतां ही निर्यात जवळजवळ बंद करण्यांत आली आहे. देशांतील शेंगदाण्याच्या तेलाचा खप वाढविण्याच्या कामीं 'वनस्पती' नें फार मोठें कार्य केलें आहे व अशा तऱ्हेनें देशांतील तेल गाळण्याच्या धंद्यास उत्तेजन दिलें आहे.

### खाण्याच्या रीतिभातींत एकवाक्यता

ह्याहून आणखीहि एक मोठा फायदा 'वनस्पती'मुळें झाला आहे. आपल्या देशांत खाण्याच्या रीतिभाती ह्या निरनिराळ्या प्रांतांतून भिन्नभिन्न आहेत. खाण्याच्या पदार्थांतील एक मुख्य भाग म्हणून तेल व तूप वापरण्यांतहि अशी भिन्न रुची सर्वत्र दिसते. उदाहरणार्थ: उत्तर प्रदेश, बंगाल व बिहारमध्यें मोहोरीचें तेल, मद्रास–गुजरातमध्यें तिळाचें तेल, मलबार–त्रावणकोर भागांत खोबरेल तेल, तर महाराष्ट्रांत करडईचें तेल लोक पसंत करतात; शेंगदाण्याचें तेल कमी प्रतीचें आहे अशा समजुतीमुळें फारसें वापरण्यांत येत नसे. 'वनस्पती' बनवितांना हें कमी वापरलें जाणारें परंतु आहारास उत्कृष्ट असलेलें तेल घेण्यांत आलें, व स्निग्ध केलेल्या व एकरुचीच्या ह्या तेलास सर्व हिंदुस्थानभर सारखीच मागणी आली. अशा तऱ्हेनें देशांत एरव्हीं ज्या वस्तूचा वापर होत नसे ती प्रामुख्यानें वापरांत आणण्याच्या कामीं या धंद्यानें मोठेंच साहाय्य केलें आहे.

### ह्यापुढील कार्य

इतकें जरी झालें असलें तरी 'वनस्पती' धंद्यास अजूनहि देशहिताचे दृष्टीनें आणखी कार्य करतां येईल. आज सरकीचें तेल फारसें काढून वापरण्यांत येत नाहीं. सरकी ही मुख्यत: जनावरांस वैरण म्हणून खाण्यास देतात. त्यांत असलेलें सुमारें १५ टक्के तेल जनावरांच्या अंगीं लागत नाहीं व इतक्या मोठ्या तेलाच्या अंशाची जनावरांस जरुरी लागत नाहीं. म्हणून हें तेल एका दृष्टीनें वायां जात आहे. सरकीचें तेल काढून तें 'वनस्पती' बनविण्यास वापरतां येण्यासारखें आहे व तेल काढून घेतलेली सरकीची पेंड सरकीच्या ऐवजीं जनावरांस देतां येईल. अशा तऱ्हेनें आज उपलब्ध असलेलें हें महत्त्वाचें तेलाचें साधन 'वनस्पती' धंदा उपयोगांत आणूं शकेल.

याचप्रमाणें हल्लीं शेंगदाण्यापासून तेल काढून घेतल्यावर जी पेंड मिळते, त्यांत सुमारें ७ ते १०% तेल तसेंच राहतें. हेंहि तेल सॉल्व्हंट एक्स्ट्रॅक्शन पद्धतीनें काढून तें 'वनस्पती' बनविण्यासाठीं वापरणें शक्य आहे. आज अशी पेंड वैरणीसाठीं किंवा शेतीस खत म्हणून बहुतांशीं वापरली जाते. पेंडींत असलेल्या तेलामुळें जनावरांस अगर शेतजमिनीस तादृश्य असा कोणताच फायदा होत नाहीं. उलट, हें तेल काढल्यानंतर पेंडीचा खत म्हणून अधिक चांगला उपयोग होईल, हें सर्वश्रुत आहेच. तेव्हां हे तेल काढून 'वनस्पती' बनविण्यास तें वापरलें तर आज वायां जाणारी ही संपत्ति वांचवितां येईल. अशा तऱ्हेनें देशामध्यें तेलाची टंचाई असतांना निदान या दोन तरी गोष्टींपासून वायां जाणारें अन्न मिळवून तें 'वनस्पती'च्या रूपानें लोकांस उपलब्ध करून दिलें तर त्यापासून देशाचें हितच होणार नाहीं काय?

अशा तऱ्हेनें 'वनस्पती' धंद्याचें अवलोकन केल्यावर खात्रीपूर्वक म्हणतां येईल कीं, भावी मराठी भाषिक राज्याला 'वनस्पती' हा एक उपयुक्त व उत्पन्नाच्या दृष्टीनें महत्त्वाचा धंदा आहे. या धंद्याची वाढ व जोपासना 'नवा महाराष्ट्र' संयोजनपूर्वक करील व नव्या महाराष्ट्राला भूषणभूत असा आदर्श धंदा बनेल, अशी उत्कट आशा मी प्रगट करतों.

---

### ग्रामोद्योगाला मध्यवर्ती सरकारची मदत

अखिल भारतीय खादी आणि ग्रामोद्योग बोर्डाला भारतीय सरकारनें आणखी मदत आणि कर्जें मंजूर केलीं आहेत. देशांतील खादीचा व्यवसाय व ग्रामोद्योग ह्यांचा विकास करण्यासाठीं ही आर्थिक मदत करण्यांत आली आहे. खादीच्या उत्पादनाला उत्तेजन देण्यासाठीं म्हणून बोर्डाला ६ लाख रुपयांचें कर्ज देण्यांत आलें आहे. ह्या रकमेपैकीं ३ लाख रुपयांची रक्कम राजस्थान खादीधंद्याला द्यावयाची असून ३ लाख रुपये मुंबई राज्याच्या ग्रामोद्योग कमिटीला द्यावयाचे आहेत. खादीच्या उत्पादनासाठीं लागणारा कच्चा माल आणि हत्यारें ह्यांच्या खरेदीसाठीं वरील रक्कम मुख्यत: खर्च करण्यांत यावयाची आहे. बोर्डाला आणखी ५ लाख रु. मदतीदाखल देण्यांत यावयाचे आहेत. खादीच्या किंमती कमी करण्यांत आल्यामुळें आणि उत्पादनाचा खर्च वाढल्यामुळें खादी उत्पन्न करणाऱ्या निरनिराळ्या संस्थांना तोटा येत आहे. तो भरून काढण्यासाठीं आणि खादीच्या उत्पादनाचीं नवीन केंद्रें चालू करण्यासाठीं वरील रकमेचा विनियोग करण्यांत यावयाचा आहे. ग्रामोद्योगांत तयार झालेल्या मालाची विक्री करण्याचा प्रश्न पुष्कळदां अवघड होऊन बसतो. मालाच्या विक्रीची संघटना न झाल्यास ग्रामोद्योग बंद पडण्याचाहि धोका उत्पन्न होतो. बोर्डाला ग्रामोद्योगाच्या मालाची विक्री संघटित करण्याचें कार्य हातीं घेतां यावें म्हणून आणखी ५ लाख रुपयांची मदत देण्यांत आली आहे. मात्र ही रक्कम बोर्डानें परत करावयाची आहे. ग्रामोद्योगांत तयार झालेला माल बोर्डानें खरेदी करावयाचा असून त्याची विक्री संघटित करावयाची आहे. हा माल खरेदी करून तो लोकांना आणि सरकारला विकण्याचें कार्य बोर्डानें करावयाचें आहे.

---

### राजगोपालाचारी भाषांतर करणार

चक्रवर्ती राजगोपालाचारी हे मॅकबेथ ह्या नाटकाचें तामीळमध्यें भाषांतर करणार आहेत.

### महाराष्ट्रांतील भुईमूग व तिळाचें उत्पन्न दर्शविणारा तक्ता

| राज्य विभाग | शेतीखालील जमीन (एकर) शेंगदाणा | तीळ | पिकाचें उत्पादन (टन) शेंगदाणा | तीळ | तेलाचें उत्पन्न (टन) शेंगदाणा | तीळ |
|---|---|---|---|---|---|---|
| मुंबई राज्य | १०,२४,००० | ३७,००० | ३,३०,००० | ३,७०० | १,३२,००० | १,६६५ |
| महाविदर्भ | ... | १,०८,००० | ... | १०,८०० | ... | ४,९४० |
| मराठवाडा | ४,१५,००० | ६२,००० | १,४०,००० | ६,२०० | ५६,००० | २,७९० |
| एकूण ... | १४,३९,००० | २,०७,००० | ४,७०,००० | २०,७०० | १,८८,००० | ९,३९५ |

टीप:—शेंगदाणा व तिळाच्या तेलाचा उतारा अनुक्रमें ४० व ५१ टक्के धरला आहे.

## १९५५ सालांतील सार्वजनिक सुट्ट्या

मुंबई सरकारनें १९५५ सालांत पुढीलप्रमाणें सार्वजनिक सुट्ट्या जाहीर केल्या आहेत:—

प्रजासत्ताक दिन ( २६ जानेवारी ), होळी ( २ रा दिवस ), (९ मार्च ), जमशेटजी नवरोज ( मार्च २१ ), रामनवमी ( १ एप्रिल ), महावीर जयंति ( ५ एप्रिल), रमझान ईद (२४मे), बकरीद ( ३० जुलै ), नारळीपौर्णिमा ( ३ ऑगस्ट ), गोकुळ-अष्टमी ( ११ ऑगस्ट ), स्वातंत्र्य दिन ( १५ ऑगस्ट ), मोहरम ( २९ ऑगस्ट ), पार्शी न्यू इयर ( २ सप्टेंबर ), खोर्दाद साल ( ७ सप्टेंबर ), गणेश चतुर्थी ( १९ सप्टेंबर ), संवत्सरी ( २० सप्टेंबर ), दसरा ( २६ ऑक्टोबर ), ईद-मिलाद ( २९ ऑक्टोबर ), आणि दिवाळी दोन दिवस ( १४ नोव्हेंबर आणि १५ नोव्हेंबर ).

याशिवाय १८८१ च्या निगोशिएबल इन्स्ट्रूमेन्ट्स् ॲक्टान्वयें न्यू इयर्स डे ( १ जानेवारी ), गुडफ्रायडे ( ८ एप्रिल ), आणि ख्रिसमस डे ( २५ डिसेंबर ) या सुट्ट्या अगोदरच जाहीर करण्यांत आलेल्या आहेत.

याखेरीज महाशिवरात्री ( २० फेब्रुवारी ) आणि महात्मा गांधी जयंति ( २ ऑक्टोबर ) हे दिवस रविवारीं येत असल्यामुळें ते सुट्टीचे दिवस म्हणून जाहीर करण्यांत आलेले नाहींत.

## कृत्रिम रेशमाचा नवा कारखाना

भारत सरकारनें इटलीमधील एका सुप्रसिद्ध रेशमाच्या कारखानदाराला भारतांत रेशमाचा कारखाना काढण्यास परवानगी दिली आहे, असें समजतें. ह्या कारखान्यांत कृत्रिम रेशीम आणि नैसर्गिक रेशीम अशा दोन्ही प्रकारचें सूत काढण्यांत येणार आहे. कारखाना काढण्यासाठीं १० कोटी रुपयांचें भांडवल लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. भांडवलाची उभारणी भारत सरकार, इटालिअन कंपनी आणि लोक अशी तीन मार्गांनीं करण्याचें घाटत आहे. इटालिअन कारखानदाराचें नांव मि. जिव्हानी रिकोटी असें आहे. कारखान्याची जागा निवडण्यासाठीं सध्या ते फिरत आहेत. त्यांच्याबरोबर दोन तज्ज्ञहि आलेले आहेत. सुरतेपासून ३ मैलांवर असलेल्या एका गांवाला त्यांनीं नुकतीच भेट दिली. ह्याच गांवीं साऊथ गुजराथ ग्रिड हें विजेचें केंद्र असल्यामुळें तें कारखान्याच्या दृष्टीनें कितपत उपयुक्त आहे हें अजमावण्याचा त्यांचा हेतु होता. कारखान्याला लागणाऱ्या सर्व सोयी उपलब्ध करून देण्यांत आल्या तर संकल्पित कारखाना २५ महिन्यांत उभारतां येणें शक्य आहे, असें कळतें. दररोज सुमारें १०,००० किलो कृत्रिम रेशमाचें आणि ५,००० किलो नैसर्गिक रेशमाचें सूत कारखान्यांत तयार होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

## सोलापूर डि. सें. को. बँकेंत शिवाजी महाराजांचा पुतळा

दि सोलापूर डि. सें. को. बँक लि. च्या आवारांत बसविलेल्या श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांचे अर्धपुतळ्याचा अनावरण समारंभ माजी प्रांताध्यक्ष दे. भ. केशवराव जेधे यांचे अध्यक्षतेखालीं मुंबई राज्याचे महसूल व शेतकी खात्याचे मंत्री दे. भ. श्री. भाऊसाहेब हिरे यांचे हस्तें दि. २९-११-५४ रोजीं झाला.

## महाराष्ट्र चेंबरचे नवे अध्यक्ष व उपाध्यक्ष

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या अध्यक्षपदीं श्री. भालचंद्र दिगंबर ऊर्फ आबासाहेब गरवारे ह्यांची बिनविरोध निवडणूक झाली आहे. श्री. के. एच. ढमढेरे, श्री. लालचंद हिराचंद आणि श्री. आर. व्ही. डोंगरे ह्यांची उपाध्यक्ष म्हणून बिनविरोध निवडणूक झाली आहे.

श्री. गरवारे हे स्वतःच्या कर्तबगारीनें पुढें आलेले महाराष्ट्रीय व्यापारी व कारखानदार आहेत. त्यांचा जन्म १९०३ मध्यें तासगांव येथें झाला. त्यांचें प्राथमिक व इंग्रजी शिक्षण सांगली येथें झालें. १९२१ सालीं त्यांनीं मुंबईस येऊन डेक्कन मोटार एजन्सी सुरू करून व्यापार-उद्योगांत पदार्पण केलें. गरवारे मोटार्स लि., गरवारे फायनान्स कॉर्पोरेशन, बॉंबे निऑन साइन्स लि., डोमिनिअन प्लास्टिक इंडस्ट्रीज, ॲटो ॲक्सेसरीज (इंडिया) लि., इत्यादि कंपन्यांचे ते प्रवर्तक आहेत. लढाईचा काळ सोडल्यास, बहुतेक दरवर्षी त्यांनीं युरोपचा प्रवास केलेला आहे.

## श्री. भाऊसाहेब साळवेकर ह्यांचा सत्कार

दि पूना इन्व्हेस्टर्स बँक लि. चे संस्थापक व मॅनेजिंग डायरेक्टर श्री. काशिनाथ बाळकृष्ण ऊर्फ भाऊसाहेब साळवेकर ह्यांनीं २७ नोव्हेंबर रोजीं ६१ व्या वर्षांत पदार्पण केलें. ह्या शुभ प्रसंगीं त्यांचा सत्कारसमारंभ श्री. के. पां. जोशी, वकील, ह्यांच्या अध्यक्षतेखालीं मोठ्या उत्साहानें साजरा करण्यांत आला. त्यावेळीं पुण्यांतील बँकर्स व व्यापारी आणि त्यांचे चहाते मोठ्या संख्येनें उपस्थित होते.


# कण आणि क्षण

( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )

पृष्ठसंख्या १६८ } दुसरी आवृत्ति { किं. १॥ रु. ट. ख. ४ आ.

लेखक : श्रीपाद वामन काळे, संपादक, " अर्थ "

" मार्मिक निरीक्षण व नाजूक विनोद " —र. पु. परांजपे

" नव्या पिढीचें उद्‌बोधक गाईड " —वि. द. घाटे

" मनरंजनाबरोबर विचारांत महत्त्वाची भर " —शं. वा. किर्लोस्कर

" प्रापंचिकाचें चित्ताकर्षक मार्गदर्शन " चिं. वि. जोशी

" खुबीनें रंगविलेलें कौटुंबिक चित्र " —इरावती कर्वे

" कर्मयोगाचे सुबोध धडे " —ना. सी. फडके

" सुबोध, व्यावहारिक व पटणारें विवेचन " —इंदिराबाई देवधर

### सिगारेटच्या जाहिरातीबाबत सूचना

सिगारेट कंपन्यांनीं आपल्या जाहिरातींत काय लिहावें व लिहूं नये, ह्याविषयीं अमेरिकन फेडरल ट्रेड कमिशननें कांहीं सूचना केल्या आहेतः—सिगारेट ओढणें किंवा एखाद्या छापाची सिगारेट ओढणें हानिकारक नाहीं, असें जाहिरातींत म्हणूं नये. घसा किंवा शरीराचा इतर भाग ह्यांचा उल्लेख करूं नये; त्याचप्रमाणें पचन, शक्ति, इत्यादींचाहि उल्लेख टाळावा. धूम्रपानास वैद्यकाचा पाठिंबा आहे, अशी समजूत करणारीं चित्रें व मजकूर छापण्यांत येऊं नये. "आमच्या सिगारेटमध्यें टॅनिनचा किंवा रेझिनचा अंश कमी आहे," असें विधान करूं नये; इतर सिगारेटसचा उल्लेख त्यांना कमीपणा आणणारा असूं नये. दर्जा, स्वाद, मिळणारा आनंद, इत्यादींच्या वर्णनावर भर असावा. सिगारेट ओढण्यामुळें होणाऱ्या परिणामांची शास्त्रीय माहिती व त्याबरोबरच सिगारेट जाहिरातदारांचें स्वतःच्या मालाचें अवास्तव वर्णन, ह्यामुळें अशा सूचना करणें जरूरीचें झालें आहे.

---

### तांदुळांत बी-१ व्हिटॅमिन मिसळा

तांदुळाच्या दाण्यांत बी-१ व्हिटॅमिनचा थोडा अंश मिसळला तर आशियांतील ८० कोटी लोकांचें आरोग्य पुष्कळच सुधारेल, असें डॉ. रॉबर्ट आर. विल्यम्स ह्यांनीं आपलें मत बोलून दाखविलें. दर माणशीं दरसाल ३५ सेंटस् (सुमारें २ रुपये) खर्चांत हें करतां येईल, असें ते म्हणाले. डॉ. विल्यम्स हे व्हिटॅमिन संशोधनांत तज्ज्ञ आहेत. बी गटांतून बी-१ हें व्हिटॅमिन त्यांनींच अलग केलेलें आहे व तें कृत्रिम रीतीनेंहि बनवून दाखविलेलें आहे.

---

**प्राचीन ग्रंथांचें जतन**—म्हैसूर येथील प्राच्य-विद्या-संशोधन मंदिरांत भारतीय संस्कृतीवरील ११,००० दुर्मिळ ग्रंथ आणि हस्तलिखितें आहेत. निरनिराळ्या लिपींत असणाऱ्या ह्या ग्रंथांचें जतन करण्यासाठीं त्यांचें चित्रीकरण करण्यांत येणार आहे. ह्याच संस्थेच्या वाचनालयांत प्राचीन भारतीय संस्कृतीवरील २०,००० ग्रंथ आहेत. त्यांतील ९,००० संस्कृत आहेत.

**आसाम ऑईल कंपनीची नवी खाण**—आसाम ऑइल कंपनीनें नहोरखातिया ह्या ठिकाणीं तेलाची नवीन विहीर खोदली होती. ही विहीर दिग्बोई येथील तेलाच्या खाणीला जोडण्यासाठीं २३ मैल लांबीचे नळ टाकण्यांत आले आहेत. तेलाच्या नळाचे औपचारिक उद्घाटन आसामचे मुख्य मंत्री श्री. विष्णुराम मेधी, ह्यांनीं नुकतेच केलें.

**कामगारांसाठीं घरें**—सौराष्ट्रामधील औद्योगिक शहरांतून कामगारांसाठीं एका खोल्यांचीं १,००० घरें बांधण्यास प्रारंभ झाला आहे. भारतीय सरकारनें ह्या योजनेला नुकतीच संमति दिली होती आणि तीसाठीं २० लाख रुपयांची मदत मंजूर केली होती.

**मोटार-वहातुकीचें राष्ट्रीयीकरण**— मध्य-भारतामधील मोटार-वहातुकीचें राष्ट्रीयीकरण पूर्ण करणारें बिल राज्य-सरकार विधिमंडळाच्या पुढील बैठकींत आणणार आहे. असें समजतें. मालाची वहातुक करणाऱ्या मोटारी मात्र बिलांतून वगळण्यांत येणार आहेत. सध्यां ज्या उरलेल्या मार्गांवर उतारूंची वहातुक खाजगी मालकीच्या मोटारी करीत आहेत, तेहि मार्ग सरकार आपल्या ताब्यांत घेणार आहे. मध्य-भारत सरकारच्या रोडवेजच्या मालकीची ५० लाखांची मालमत्ता आहे.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक लिमिटेड

**हेड ऑफिस : पुणें शहर**

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, श्रीरामपूर (बेलापूर रोड), ओझर (जि. नाशिक) खोपोली (जि. कुलाबा)

श्री. के. पां. जोशी (अध्यक्ष) | श्री. ह. ब. गिरमे (उपाध्यक्ष)

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | रु. ७,९३,८१० |
| वसूल भांडवल | रु. ४,००,००० |
| रिझर्व्ह फंड व इतर रिझर्व्ह | रु. १,००,००० |

**एकूण खेळतें भांडवल ६० लाखांचे वर**

बँकेचे नवीन इमारतींत माफक भाड्यांत सेफ डिपॉझिट लॉकर्सची सोय केली आहे.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

श्री. रा. बा. साळवेकर B. A., LL. B.
श्री. नी. ना. क्षीरसागर
*मॅनेजिंग डायरेक्टर.*

# पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव (मावळ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतहि सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीहि स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याखेरीज पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडींची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. खडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना), पुणें ४, येथें प्रसिद्ध केलें.